# आचारसंहिता

इट्स कॅश कार्ड लिमीटेड (आय.सी.सी.एल) आपला व्यवहार न्याय्य कायदे, नियम व अटी यांनुसार करून मूल्याधिष्ठित व्यवहार व नीतीचे नवे आदर्श प्रस्थापित करण्यास कटिबध्द आहे.

आय.सी.सी.एल. ला ही आचारसंहिता योग्य व्यवहार आणि वर्तणुकीसाठी मार्गदर्शक तत्व म्हणून समर्पक वाटते ज्याने सर्व संचालक आणि कर्मचा-यांना कंपनी आणि तिच्या भागधारकांना अपेक्षित असलेल्या दर्जाबाबत जाणीव होईल.

ह्या आचारसंहिता अन्वये, कंपनीचे सर्व संचालक आणि कर्मचारी हे, दिलेल्या निर्णयांची आणि योजनांची अंमलबजावणी, कंपनी आणि तिच्या भागधारकांच्या हितासाठी, त्यांना दिलेल्या अधिकाराच्या सीमेत करण्यासाठी कर्तव्यबध्द आहेत.

ही नियमावली व्यावहारिक अनुभव आणि वागणुकीची तत्वे, जी आमच्या कटिबध्दतेला आधारभूत आहेत, प्रतिबिंबित करते. कंपनीच्या संचालकांची समिति ("द बोर्ड") ह्या नियमावलीतील नियम स्थापित करण्यासाठी आणि त्यांच्यात सुधारणा करण्यासाठी जवाबदार आहेत, ज्या न्यायिक आणि प्रशासकीय विकासाच्या निदर्शक आहेत. नैतिक मार्गदर्शन मिळावे तसेच नैतिक-अनैतिक व्यवहारामधील भेद कळावा, ज्याची जवाबदार आणि प्रामाणिक कार्यसंस्कृतीच्या निर्मितीमधे मदत व्हावी, हा ह्या नियमावलीचा उद्देश आहे. सर्व संचालक आणि कर्मचा-यांनी ही आचारसंहिता वाचणे, समजून घेणे, आणि त्याच्या किंवा तिच्या कर्तव्य, कार्ये आणि जवाबदा-या पार पाडण्यासाठी तिचा वापर करणे अपेक्षित आहे.

सर्व संचालकांनी आणि कर्मचा-यांनी स्वतः आचारसंहिताचा परिपाठ करून त्याचा अंगिकार करावा. आचारसंहिता चा सामंजस्यपुर्वक अंगिकार न झाल्यास ज्या व्यक्ती तिचे उल्लंघन करतात आणि इतर, जे तिचे पालन करत नाहीत, त्यांच्यावर योग्य कारवाई केली जाईल. आचारसंहितेमध्ये दिलेल्या बाबींची चर्चा सर्वसामान्यपणे केलेली असून संचालक आणि कर्मचा-यांना ज्यातुन जावे लागते ती प्रत्येक परिस्थिती त्यात चर्चिली गेलेली नाही. अडचणीच्या परिस्थितीत संचालक समितीने आचारसंहितेच्या संदर्भात मार्गदर्शन करावे.

कंपनी आचारसंहितेच्या संदर्भात मान्यता अधिकारी म्हणून कंपनी सचिवाची नेमणूक करते, जो संचालकांच्या / कर्मचा-यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता उपलब्ध असेल आणि त्यांना आचारसंहितेचा अंगिकार करण्यासाठी मदत करेल. मान्यता अधिका-याकडे आलेल्या तक्रारी तपासणीकरिता हिशेब तपासणी समितीच्या अध्यक्षांकडे सोपवल्या जातील.

**पात्रता**

१. ही आचारसंहिता कंपनीच्या संचालक समितीच्या सर्व सभासदांना आणि कर्मचा-यांना लागू आहे.

२. ह्या आचारसंहितेमध्ये नमूद केलेली तत्वं सामान्य स्वरूपाची असून सर्व संचालक आणि कर्मचा-यांना विनंती आहे की त्यांनी नेमक्या सूचनांसाठी कंपनीच्या इतर योजना आणि कार्यपद्धती पहाव्यात. काही स्पष्टीकरण हवे असल्यास मान्यता अधिका-यांशी संपर्क साधावा.

३. ही कंपनी रोखे बाजारात सूचीबध्द नसल्याने काही तरतुदी आवश्यक नाहीत. प्राप्त परिस्थितीच्या संदर्भात त्यांचा विचार पुढे केला जाईल.

४. स्पष्टीकरण

ह्या योजनेत, जो पर्यंत विसंगती दिसून येत नाही :

अ. एक अंतर्भूत अनेक किंवा ह्या उलट

आ. पुलिंगी, स्त्रीलिंगी, किंवा नपुसकलिंगी दर्शविणा-या कोणत्याही शब्दाचा किंवा उदगाराचाच फक्त ह्या तिन्ही लिंगाना निर्देशित करण्यासाठी वापरला जाईल.

**१. सामान्य नियमावली**:

अ. आय.सी.सी.एल. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी, ज्यामध्ये ती स्वत: देखील समाविष्ट आहे, सहाय्यभूत ठरण्यास कटिबध्द आहे. आय.सी.सी.एल अशी कोणतीच योजना हाती घेणार नाही जी समाजाच्या हितासाठी हानिकारक ठरेल ज्यात ती स्वतः कार्यरत आहे. आय.सी.सी.एल.चे व्यवस्थापन आणि व्यापार, जे अधिकतम प्रमाणात आणि सुयोग्य दरात दिले जाईल, हे देश, विभाग आणि समाजाच्या फायद्यासाठी असेल आणि ते कायदा आणि देशाच्या आर्थिक प्रगती योजनेनुसार असतील.

ब. आय.सी.सी.एल तिच्या जमाखर्चाचे खाते प्रामाणिक व योग्य पद्धतीने तयार करेल आणि जमाखर्चाच्या व आर्थिक अहवालाच्या दर्जानुसार त्याचे नियमन करेल ज्यामध्ये देशाची सामान्यता स्वीकारलेली मार्गदर्शक तत्वे,कायदा आणि नियम, ज्याअंतर्गत कंपनी तिचे व्यवहार चालवते, ध्वनित झालेली असतील. कंपनीच्या अन्तर्गत जमाखर्चाची आणि त्याच्या तपासणीची प्रक्रिया प्रामाणिक आणि योग्य रितीने केलेल्या व्यवहाराची देवाणघेवाण आणि ठेव्यांच्या मांडणीची निदर्शक असेल आणि कंपनीत अन्तर्गत नियंत्रण असेल, जे कंपनीच्या संचालक समितीला आणि भागधारकांना सर्व व्यवहारांच्या कायदेशीरपणाबद्दल आश्वस्त करेल. सर्व आवश्यक माहिती कंपनीच्या हिशेबतपासनीस आणि इतर अधिकारी व्यक्ती आणि सरकारी संस्थांना उपलब्ध असेल. नोंदवह्यांतील व्यवहाराची कोणतीही नोंद हेतुपुरस्सर वगळली जाणार नाही,तसेच कुठलेही आगाऊ उत्पन्न आणि बँकेची गुप्त खाती व निधी असणार नाहीत. हेतुपुरस्सर, कोणत्याही गोष्टीची आणि/किंवा आर्थिक खात्यांची आणि अहवालाची चुकीची माहिती आढळल्यास नियमावलीचे उल्लंघन केल्याचे समजले जाईल, शिवाय अनुषंगिक कायद्याअन्तर्गत सामाजिक अपकृत्य किंवा गुन्हेगारी कृत्य केल्यासारखे होईल. कोणताही कर्मचारी अनुचित रक्कम, दलाली किंवा लाच देणे व/वा घेणे या सहभागी होणार नाही.

क. आय.सी.सी.एल.चा खुल्या बाजारातील खुल्या आणि स्पर्धापूर्ण व्यापाराला आणि विकासाला पूर्ण पाठींबा आहे. विशेषतः आय.सी.सी.एल. कोणत्याही व्यापारासंबंधीच्या लबाड्यांसारख्या कृत्यांमध्ये अडकणार नाही किंवा तयार होणाया मक्तेदारी,अंमलदारी स्थिती यांसारख्या बाजारातील अयोग्य चालीरितींना पाठींबा देणार नाही. आय.सी.सी.एल. त्यांचा माल आणि सेवा स्वतःच्या गुणवत्तेच्या बळावर व्यापारपेठेत आणेल तसेच तिच्या प्रतिस्पर्ध्यांच्या माल आणि सेवेसंबंधी कोणतेही अनुचित वक्तव्य करणार नाही. कोणतीही स्पर्धात्मक माहिती सामान्य व्यापाराच्या ओघातच दिली जाईल आणि अश्या प्रकारची कोणतीही माहिती कायदेशीर परवानगी असलेल्या माध्यमातूनच मिळवली जाईल.

ड. आय.सी.सी.एल तिच्या भागधारकांच्या आणि सामान्य लोकांच्या माहितीच्या आवश्यकतेचा मान ठेवते. कंपनी आणि तिच्या व्यवहारा संबंधीची माहिती सर्व संबंधीतांना उदा. प्रसारमाध्यमे, आर्थिक संघ, कर्मचारी आणि भागधरांसमोर आणण्यासाठी, आय.सी.सी.एलचे प्रतिनिधित्व फक्त तिचे विशेषतः नियुक्त संचालक आणि कर्मचारीच करतील. कंपनीची माहिती उघड करण्याची जवाबदार सर्वस्वी ह्या अधिकारी मंडळींवरच असेल.

इ. आय.सी.सी.एल. च्या नावाचा, लोगोचा आणि व्यापार चिन्हांचा वापर माहितीपुस्तिका, नियमावली आणि करारान्वयेच करता येईल. आय.सी.सी.एल. कडून मान्यता मिळालेल्या काही नेमक्या संस्थांशिवाय कोणतीही तिसरी संस्था ह्या लोगो आणि व्यापार चिन्हांचा स्वतःच्या हितासाठी वापर करू शकत नाही.

**२. कंपनीच्या संचालकांना / संचालक मंडळाच्या सभासदांना लागू असलेले नियमः**

अ. समितीचे संचालक / संचालक मंडळाच्या / समितीच्या बैठकींना हजर राहण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतील आणि तो /ती सभांना गैरहजर राहिल्यास अध्यक्षांना कळवेल. जर एखाद्या सभासदाने सुयोग्य कारणास्तव संचालक मंडळा बैठक काही वेळा चुकवली असेल, ज्यामुळे तो /ती त्याची / तिची बांधिलकी पूर्ण करू शकत नसेल, तर त्याने / तिने संचालक मंडळाचे सदस्यत्व पुढे चालू आहे असे समजावे अथवा त्याच्या / तिच्या ऐवजी दुस-या संचालकाची नेमणूक करावी. सभेला येण्यापूर्वी सभासदांनी कार्यक्रमपत्रिका, सभेच्या सूचने सोबत दिलेली संबंधित कागदपत्रे वाचून आणि समजून घेणे आणि चर्चेला तयार राहणे अपेक्षित आहे. सभासदांचा संचालक मंडळाच्या चर्चेत उत्साहपूर्ण आणि विधायक सहभाग राहील आणि ते संचालक मंडळाचा कसा कारभार चालवेल आणि कश्या पद्धतीने चालवेल ह्या संबंधी मान्य केलेल्या मार्गाचं आचरण करतील. सभासद चर्चेत असलेल्या किंवा संचालक मंडळाच्या विचारार्थ असलेल्या विषयांवर आपले मत, दृष्टीकोण, प्रतिकूल मत व्यक्त करू शकतात. वेळोवेळी संचालक मंडळ विशेष निर्णयांकरिता काही समित्यांची नेमणूक करू शकतो. संचालक मंडळाने सुचवलेले समितीचे सभासद समितीच्या अशा सर्व सभांना हजर राहतील आणि समिती समोर असलेले सर्व विषय ठराविक वेळेत आणि पद्धतीत सोडविले जातील याची खात्री देतील. सध्या संचालक मंडळाने खालील समितींची नेमणूक केली आहेः

- हिशेब तपासणी समिती
- मोबदला समिती

ब. संचालक मंडळाच्या सभांच्या कारभारात सक्रीय सहभाग

कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभांच्या कारभारात सभासद सक्रीय सहभाग घेतील आणि ध्येयवादी नेतृत्वशक्ती सादर करतील तसेच व्यापाराला आणि संस्थेला मार्ग दाखवण्यासाठी सकारात्मक योगदान देतील आणि कंपनी तिच्या भागधारकांशी असलेली बांधिलकी तसेच कायदा आणि नियमांच्या गरजा पूर्ण करत आहे याची काळजी घेतील. काही कामाची जवाबदारी दिल्यास संचालक कंपनीच्या व्यवहारात प्रामाणिकपणे, विश्वासाने आणि संस्थेच्या, इतर संचालकांच्या हितासाठी सहभाग

घेतील तुल्यबळ परिस्थितीत काळजीपूर्वक, मेहनतीने,आणि एका रास्त धोरणी व्यक्तीसारखे कार्य करतील.व्यवस्थापनाला दिलेले कार्यस्वातंत्र्य अबाधित राखत कंपनीचा कारभार व व्यापार पाडणे हे संचालक मंडळाचे कर्तव्य राहिल.

क. काही अहवाल/नियम परत तपासण्याचे कर्तव्य

संचालक मंडळाने काही अहवाल / कंपनीच्या व्यवहाराचे नियम सांगितल्या प्रमाणे वेळो वेळी पुन्हा तपासण्याची आवश्यकता आहे. अशा काही अहवालाची/नियमांची सूची पुढील प्रमाणे आहे. प्रस्थापित केलेल्या नियमांमध्ये कायदेशीर निर्बंध पूर्ण करण्यास तसेच कंपनीच्या सुरळीत आणि पारदर्शक व्यवहारासाठी समिती योग्य वाटेल अशा पद्धतीने बदल करू शकते.

अ. १९५६च्या कंपनी कायद्या अंतर्गत प्रस्थापित केलेले कायदेशीर निर्बंध
ब. आवश्यक अहवालांसहित त्रैमासिक आणि वार्षिक आर्थिक विधाने.
फ. वार्षिक कामकाज योजना आणि अंदाजपत्रके
ग. कार्यकारी आणि अकार्यकारी संचालकांसाठी आणि कर्मचा-यांसाठी मोबदला योजना
ई. अन्तर्गत व्यापाराला आळा घालण्यासाठी, संचालक मंडळ आणि कर्मचा-यांसाठी असलेली आचारसंहिता, अधिकारपत्र योजना इ.चा समावेश असलेल्या अंतर्गत नियमावली अंमलात आणणे व त्यांची तपासणी करणे.

ड. अखंडीत प्रकटीकरणे

कंपनी कायदा, रोखे बाजाराशी असलेला करार आणि इतर लागू असलेल्या कायद्याअंतर्गत संचालकांनी कंपनीला काही माहिती मधून मधून उघड करून दाखवावी किंवा अधिका-यांनी प्रकटीकरणांमध्ये वेळोवेळी झालेली प्रगती दाखवून द्यावी. अशा काही प्रकटीकरणांच्या आवश्यकता संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे आहेत :

१) इतर कंपन्या / संस्था इत्यादींच्या हितासंबंधीची प्रकटीकरणे

संचालक मंडळाचे सदस्य कंपनी सचिवाच्या आदेशावरून वेळ देतील आणि जिथे कुठे तात्पुरते बदल आढळतील तिथे सविस्तरपणे त्याच्या रोजगाराविषयी, इतर व्यावहारिक प्राधान्यांविषयी आणि इतर कंपन्या / संस्थांविषयी ज्यांमध्ये तो प्रत्यक्ष किंवा त्याच्या नातेवाईकांमार्फत संबंधित आहे, ह्या संबंधीत माहिती कळवतील.

२) काही व्यवहारांचे प्रकटीकरण

संचालक मंडळाचे सभासद मान्य करतात की जिथे कंपनी कोणत्याही इतर कंपनीसोबत एखादा करार करते ज्यामध्ये कोणत्याही सभासदाने त्याचा संबंधीत कळवला आहे असा करार संचालक मंडळासमोर त्यावेळीच तसेच वार्षिक अहवालामध्येही उघड करण्यात येईल.

३) कंपनीच्या / संस्थांच्या गंभीर चुका जिथे त्याला रस आहे

संचालक मंडळाचे सभासद ह्याबाबत आश्वस्त करतील की, ज्या कोणत्या कंपनीत ते संचालक आहेत तिथे कोणत्याही गंभीर चुकांमध्ये त्यांचा सहभाग नसेल जसे की कोणत्याही आर्थिक संस्थांना कर्ज परत न फेडणे, व्याज, मुदत ठेवींची परत फेड, वार्षिक कर न भरणे, सेबी आणि इतर लागू असलेल्या कायद्यांचे उल्लंघन. जेव्हा अशी परिस्थिती उद्भवेल तेव्हा संचालक पुढील योग्य कृतीसाठी कंपनी सचिवाची मदत घेतील आणि संचालक मंडळाला कळवतील.अश्या प्रकारचा जाहीरनामा, सांगितलेल्या पद्धतीनुसार दरवर्षी कंपनीला दिला जाईल.

४) भागधारण आणि संचालनासंबंधी प्रकटीकरण

समितीचे सभासद उघड करतील :

- कंपनीतील हितकारक भागधारणाचे आणि / किंवा सवलतींचे तपशील नेमणूकीच्या वेळेस आणि नंतर जेव्हा गुप्त व्यवहाराच्या काही योग्यता / सुरक्षा नियमांमध्ये बदल होत असतील तेव्हा देणे.
- इतर कंपन्यांमधील संचालकपदाचे / समिती सदस्यत्वाचे तपशील नेमणूकीच्या वेळेस आणि त्यानंतर दरवर्षी सादर करणे. वर्षभराच्या आत काही बदल झाल्यास तो कंपनीला कळवण्यात यावा आणि पुढील बैठकीत त्याची नोंद केली जावी.

**३. भागधारकांप्रति वचनबध्द असण्याचे संचालक आणि कर्मचा-यांसाठीचे नियम :**

अ. आपली कर्तव्ये पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी आणि कंपनीतील भागधारकांच्या फायद्यासाठी प्रामाणिकपणे निर्णय घेणे.

ब. आपल्या स्वतंत्र निर्णयावर परिणाम न होऊ देता कंपनी आणि तिच्या भागधारकांच्या हितासाठी काळजीपूर्वक, सातत्यपूर्वक आणि स्पर्धात्मक निर्णय घेणे.

क. संचालक मंडळ किंवा संस्थेच्या सध्याच्या रचनेनुसार इतर कार्यक्षम अधिकारी मान्य करीत नाही तोपर्यंत कंपनीच्या कोणत्याही स्थावर आणि जंगम

मालमत्तेचा वापर व्यक्तीगत करारासाठी न करणे ज्यामुळे त्यांची किंमत कमी होईल किंवा कंपनी त्यांना गमावून बसेल.

ड. कंपनी आणि तिच्या भागधारकांप्रति त्यांच्या कर्तव्याची कायम जाण ठेवणे जेणे करून त्यांनी त्यांचे कर्तव्य त्यांचे सर्वोच्च ज्ञान आणि कौशल्य पणाला लाऊन पार पाडावे.

ई. आय.सी.सी.एल. आपल्या भागधारकांना मूल्यसंवर्धनासाठी आणि भागधारकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी असलेल्या नियमांचे आणि कायद्यांचे पालन करेल. आय.सी.सी.एल.चे संचालक मंडळ त्याच्या भागधारकांना वेळोवेळी आणि प्रामाणिकपणे कंपनीच्या व्यवहाराच्या बाबींविषयी कळवतील आणि त्याबाबतच्या नियम आणि करारांनुसार अशी माहिती उघड करतील.

फ. कंपनीचा कोणताही संचालक किंवा कर्मचारी स्वतःला किंवा इतरांना कंपनीच्या खाजगी माहितीतून फायदा मिळवण्यासाठी मदत करू शकत नाही आणि जी माहिती अंतर्भूत माहिती म्हणून स्थापित आहे त्याबद्दल सर्व अधिकारी आणि कर्मचारी सेबीने लागू केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करतील.

कोणताही संचालक / कर्मचारी प्रसारमाध्यमांना तोपर्यंत कोणतीही अंतर्गत माहिती औपचारिक किंवा अनौपचारिकरित्या पुरवणार नाही जोपर्यंत त्याला तसे अधिकार दिले जात नाहीत.

अंतर्गत माहितीत पुढील बाबी येतात :

- व्यापार किंवा व्यापारी गटाची खरेदी आणि विक्री
- नवीन उत्पादनाची किंवा विकासाची घोषणा
- आर्थिक माहिती उदा. नफा, मिळकत आणि नफ्याचा वाटा
- गुंतवणूकीचे निर्णय / योजना
- मालमत्तेचे पुर्नमूल्यांकन
- पुनर्रचनेची योजना
- कामकाजाचे मुख्य करार
- निधी उभारणे
- कोणतीही इतर किंमतीच्या दृष्टीने संवेदनशील असलेली माहिती खास करून कंपनीच्या शेअरची बाजारतील किंमत जेव्हा कंपनी एखाद्या प्रसिध्द शेअर बाजाराच्या सूचीमध्ये समाविष्ट केली जाईल.
- कोणतीही माहिती जिथे कंपनीने गोपनीयतेचा करार केला आहे.

**४. कर्मचा-यांप्रति वचनबध्द असण्याचे संचालकांसाठीचे नियम :**

क. कर्मचा-यांना योग्य मोबदला देणे

ख. काम करण्याच्या जागेतील वातावरण कर्मचा-यांसाठी पोषक, कार्यक्षमता वाढवणारे आणि सुरक्षित ठेवणे.

ग. कर्मचा-यांसंबंधी असलेले कायदे आणि नियम काटेकोरपणे पाळणे.

घ. कर्मचा-यांच्या व्यक्तिमत्वाला आणि मानवतेला मान देऊन त्यांना विनम्रतेने आणि आदरपूर्वक वागवणे.

घ. कर्मचा-यांना संस्थेत चालू असलेल्या बेकायदेशीर कृत्यांची नोंद करण्याची संधी देणे.

ङ. कर्मचा-यांना पगारवाढ आणि पदोन्नती देणे तसेच कर्मचा-यांची योग्यता, कौशल्य,ज्ञान आणि क्षमता लक्षात घेऊन त्यांना उत्तेजन देणे.

च. कर्मचा-यांना समान संधी देऊन त्यांच्या ज्ञानाला आणि क्षमतेला प्राधान्य देणे आणि त्यांच्या व्यावहारिक ज्ञानाच्या आधारे त्यांनी केलेल्या टीका आणि दिलेले सल्ले लक्षात घेणे.

छ. सर्व कर्मचा-यांना आणि रोजगारासाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांना वंश, जात, धर्म, वर्ण, घराणे, वैवाहिक स्थिती,लिंग, वय, राष्ट्रीयत्व आणि अपंगत्व लक्षात न घेता समान संधी उपलब्ध करून देणे.

ज. सर्व कर्मचा-यांना मानाने आणि कामाच्या ठिकाणी शारीरिक ,शाब्दिक किंवा मानसिक स्वरुपाच्या लैंगिक शोषणापासून मुक्त ठेवण्याच्या धोरणाने वागवणे.

झ. कर्मचा-यांमध्ये एकात्मतेचे आणि ऐक्याचे वातावरण निर्माण होइल असे पाहणे.

ञ. आय.सी.सी.एल.चा कर्मचारी त्याच्या / तिच्या व्यक्तिगत जीवनात कंपनीच्या किंवा गटाच्या व्यापारावर किंवा हितावर विपरीत परिणाम होऊ न देता कोणत्याही सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक कार्यामध्ये सहभागी होऊ शकतो.

**५. ग्राहकांप्रति वचनबध्द असण्याचे संचालक आणि कर्मचा-यांसाठीचे नियम :**

अ. ग्राहकांना चांगली सेवा उपलब्ध करून देणे.

आ. ग्राहकांशी मान्य केलेल्या अटींचे काटेकोरपणे पालन करणे.

इ. ग्राहकांचे आणि संस्थेचे फायदे सतत वाढविण्यासाठी मार्ग शोधणे.

ई. ग्राहकांसोबत गोपनीयतेचे काटेकोर पालन करणे आणि ग्राहकांच्या गुप्त गोष्टी, वैयक्तिक , कामकाजाच्या किंवा दोन्ही, ह्यांचा स्वतःच्या किंवा त्यांच्या संबंधित गटांच्या हितासाठी अयोग्य वापर न करणे.

ए. कोणत्या वेळे जर ग्राहकासोबत केलेल्या करारामधल्या एखाद्या अटीचे

ग्राहकाकडून पालन न झाल्यास त्याला ह्याबद्दल पूर्वसूचना देणे ज्या योगे परस्परांसाठी समाधानकारक उपाय शोधता येईल.

**६. वेगवेगळ्या कायदेविषयक संस्थांप्रति वचनबध्द असण्याचे संचालक आणि कर्मचा-यांसाठीचे नियम :**

संचालक व कर्मचा-यांनी संबंधित कायदेविषयक संस्थांच्या अधिका-यांच्या कुठल्याही सार्वजनिक प्रकटीकरणाबाबत चौकशीची योग्य आणि चोख उत्तरे देणे कंपनीला अपेक्षित आहे. त्यामुळे कंपनीच्या संबंधित कायदेविषयक संस्थांमधील नोंदी पूर्ण, योग्य, अचूक आणि वेळेत होतील. संचालक व कर्मचा-यांनी गरजेनुसार योग्य ती सर्व माहिती पुरवणे अपेक्षित आहे.

**७. १९५६ च्या कंपनी कायद्याची सर्वोच्चता :**

कंपनी कायद्या १९५६ व त्या अंतर्गत केलेले कायदे व नियम यांच्याशी जर ह्या आचारसंहितेचे मतभेद झाले तर कंपनी कायद्या १९५६ व त्या अंतर्गत केलेले कायदे व नियम यांस प्राधान्य देण्यात येईल.

**८. आचारसंहितेमधील सुधारणा :**

ही आचारसंहिता फक्त कंपनीतील समितीच्या संचालकांद्वारे सुधारली जाईल किंवा एखाद्या लागू असलेल्या कायद्यान्वये वा नियमान्वये आवश्यक झाल्यास कंपनीच्या संचालक समितीच्या सदस्यांद्वारेच उघड केली जाईल. सर्वसाधारण धोरणानुसार या आचारसंहितेतून कोणालाही सूर मिळणार नाही.

मुंबई
दिनांकः १ एप्रिल, २००९ ------------------
(स्वाक्षरी)